# मोरपीस

पाऊलवाटेवरून चालताना
पायाखालच्या मातीत
अचानक काहीतरी चमकतं.
जरा वाकून, निरखून पाहील्यावर
दिसतं एक मोरपिस,
धुळीनं थोडं माखलेलं...
आपण हलकेच ते उचलतो
धुळ झटकतो,
त्याच्या मोरपंखी डोळ्याकडे
आसुसून पहातो,
हलकेच गालावरून फिरवतो..
आणि मग आपल्या डायरीत
ठेवून देतो जपून
एका संस्मरणीय शकुना सारखं!
आपलं नातं असंच काहीसं
अचानक जीवनाच्या प्रवासात गवसलेलं
जगण्याला श्रीमंत करून गेलेलं....
जपून ठेवणार आहे मी
ही मखमली आठवण
हृदयाच्या कुडीत
अखेरपर्यंत !!!

©प्रीती देशपांडे